# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

# Date 10 August 2024

# Time 01.00 to 01.05 PM

# Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १० ऑगस्ट २०२४ दुपारी १.०० वा.**

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी केरळमध्ये कन्नूर विमानतळावर पोहोचले असून हेलिकॉप्टरने वायनाड इथल्या भूस्खलनग्रस्त भागाचं ते हवाई सर्वेक्षण करत आहेत. यानंतर पंतप्रधानांनी लष्कराने बांधलेल्या बेली ब्रिज, मदत शिबिर आणि स्थानिक रुग्णालयाला भेट देतील तसचं या आपत्तीतून वाचलेल्या नागरिकांशी संवाद साधणार आहेत.

****

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकल्यानंतर भारतीय पुरुष हॉकी संघातल्या खेळाडूंचं दिल्ली विमानतळावर आज आगमन झालं. यावेळी कर्णधार हरमनप्रीत सिंग, गोलरक्षक पीआर श्रीजेश आणि माजी कर्णधार मनप्रीत सिंग यांच्यासह अन्य खेळाडूंचं भव्य स्वागत करण्यात आलं.

****

महाराष्ट्र राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारत निवडणूक आयोगानं यावर्षीच्या दुसऱ्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाची घोषणा केली आहे. या कार्यक्रमातंर्गत पात्र नवमतदारांच्या नोंदणीसह विद्यमान मतदारांना ६ ते २० ऑगस्ट या कालावधीत मतदार यादीतल्या आपल्या तपशीलांमध्ये बदल, दुरुस्त्या, अद्ययावतीकरण करता येणार आहे, तरी सर्व मतदारांनी मतदार यादीत आपलं नाव तपासून घ्यावं आणि आपला मोबाईल क्रमांक मतदान ओळखपत्राला जोडून घ्यावा, असं आवाहन निवडणूक आयोगानं प्रसिद्धीपत्राद्वारे केलं आहे.

****

प्रधानमंत्री शहरी आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्याला केंद्रीय मंत्रीमंडळानं मंजुरी दिली आहे. २०२४-२५ ते २०२८-२९ दरम्यान प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजना लागू करण्यासही केंद्रीय मंत्रीमडळानं मंजुरी दिली आहे. केंद्रीय सूचना आणि

प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल या संदर्भातल्या बैठकीनंतर ही माहिती दिली. या योजनेअंतर्गत ३ लाख ६० हजार कोटी रुपये खर्चून ३ कोटी घरकुलं बांधण्यात येणार आहेत, यापैकी २ कोटी घरकुलं ग्रामीण तर १ कोटी घरकुलं शहरी भागात बांधण्यात येणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

मुंबईचे माजी पोलिस आयुक्त परमवीर सिंग यांनी माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर भाजप नेते तसंच तत्कालीन विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांना अटक करण्यासाठी आपल्यावर दबाव आणल्याचं म्हटलं आहे. दरम्यान, परमबीर सिंग यांनी भाजपचे नेते आणि स्वतः मला अटक करण्याच्या ज्या बाबी समोर आणल्या आहेत त्या खऱ्या असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपुरात प्रसारमाध्यमांशी बोलताना म्हटलं आहे.
हे खोटे आरोप लावण्याबाबतचे व्हिडिओ पुरावे सुद्धा केंद्रीय अन्वेषण विभागाला आम्ही सादर केल्याचंही त्यांनी सांगितलं.

****

मराठी सिनेसृष्टीतील दिग्गज अभिनेते विजय कदम यांचं आज मुंबईत त्यांच्या राहत्या घरी निधन झालं. ते ६७ वर्षांचे होते. गेल्या दीड वर्षांपासून ते कर्करोगाने त्रस्त होते.
विजय कदम यांनी रंगभूमीबरोबरच मराठी चित्रपटात देखील काम केलं. त्यांचं `विच्छा माझी पुरी करा हे लोकनाट्य आणि `खुमखुमी` हा त्यांचा कार्यक्रम खूप गाजला. ‘रथचक्र’, ‘टुरटूर’ यांसारख्या नाटकांमधून आपल्या अभिनयाची छाप पाडणाऱ्या विजय कदम यांनी १९८०च्या दशकात विनोदी भूमिका साकारून आपल्या कारकीर्दीला सुरुवात केली होती. ‘चष्मेबहाद्दर’, ‘पोलिसलाईन’, ‘हळद रुसली कुंकू हसलं’ आणि ‘आम्ही दोघ राजा राणी’ हे त्यांचे चित्रपटही खूप गाजले. त्यांच्या निधनामुळे मराठी सिनेसृष्टीने एक हरहुन्नरी कलाकार गमावला असल्याची भावना सर्व स्तरातून व्यक्त होत आहे. विजय कदम यांच्या पार्थिव देहावर आज अंधेरी मधल्या ओशिवरा स्मशानभूमीत अंतिम संस्कार करण्यात येणार आहेत.

****

आज जागतिक सिंह दिवस साजरा करण्यात येत आहे. सिंहांच्या संरक्षणाबाबत जनमानसात जागरुकता वाढवणं, हा यामागचा उद्देश आहे. जागतिक स्तरावर सिंहांचं कमी होणारं प्रमाण पाहता त्यांच्या संरक्षणासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज हा दिवस अधोरेखित करतो. १५ ऑगस्ट २०२० या दिवशी घोषित करण्यात

आलेली मोहीम प्रोजेक्ट लॉयन आशिया खंडातल्या सिंहांच्या भवितव्यासाठी एक महत्वपूर्ण पाऊल आहे.

****

छत्रपती संभाजीनगर शहरानजीकच्या भांगशी माता गड इथं विविध विकासकामांसाठी दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून भांगशी माता गडाच्या विकासासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही, असं आश्वासन जिल्ह्याचे पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी दिलं आहे. भांगशी माता गड, शरणापूर इथं आयोजित श्री पशुपतयेश्वर महादेव मंदिर वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात आज ते बोलत होते.

****